## दैत्यवध

महायुद्धाचा दिवस होता उगवता
आरूढ सिंहावर तयार अंबामाता
पाठी ढाल त्रिशूळ हाती खड्ग गदा
कटी लुगडे भरडे मानेला बुचडा ||१||

करुणाहीन अक्ष दोन आग ओकती
मुखातूनी डोकावे जीभ लवलवती
चरण शार्दुल-उदरी टाचा मारीती
सज्ज शूर सैनिक उदो उदो करीती ||२||

ऐकू येई दुरून असुर कोलाहल
सुरासुर सैन्ये परस्परा भिडतील
घनघोर संग्राम दहा दिन चालेल
भक्त परी निश्चिंत अंबा असुरा मारील ||३||

– नारायण
घटस्थापना शके १९४५
(१०/१५/२३)